25 MAR 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जाहिरात क्र. ०२/२०२६

पद : सहयोगी शिक्षक

(Contributory Teacher)

शिवाजी विद्यापीठामध्ये २०२६-२७ या संपूर्ण वर्षाच्या (प्रथम व द्वितीय सत्राकरीता) विविध अधिविभागामधील अभ्यासक्रमांसाठी अध्यापन करण्यासाठी सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपामध्ये नेमावयाचे आहेत. सदर पदासाठी विद्यापीठ नियमानुसार अध्यापनासाठी कार्यभार व त्याबाबतचे मानधन देण्यात येईल.

विद्यापीठामध्ये सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून अध्यापनाचे कामकाज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Recruitments Tab वर दिलेल्या लिंकवर अर्ज दि. ०६ एप्रिल, २०२६ पर्यंत भरावा. अंतिम दिनांकानंतर केलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

दिनांक : २५/०३/२०२६
स्थळ : कोल्हापूर

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 MAR 2026 लोकसत्ता

# विलिंग्डन महाविद्यालयात आज आंतरराष्ट्रीय परिषद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**सांगली :** डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचालित सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालय येथे 'अन्वयः मानवविद्या, विज्ञान व तंत्रज्ञानातील उदयोन्मुख प्रवाहांचे परिवर्तनशील आयाम या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद बुधवारी (दि. २५) ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने आयोजित करण्यात आली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य सातप्पा सावंत यांनी सोमवारी पत्रकार बैठकीत दिली.

या परिषदेत जर्मनी (बर्लिन) येथील मानसशास्त्रज्ञ व मानसिक आरोग्य तज्ज्ञ डॉ. शाहिना प्रवीन या प्रमुख वक्त्या म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.

पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमाळकर व शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागप्रमुख व मानव्य विद्या शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. महादेव देशमुख, युनिव्हर्सिटी ऑफ मेडिकल सायन्स अमेरिका येथील डॉ. रेणुका रामचंद्र, चंडेला विद्यापीठ मध्य प्रदेश येथील डॉ. कुलदीप सांगरेकर, बेळगावचे अनिल काळे, कोल्हापूरचे डॉ. रणधीर शिंदे, बारामतीचे सुनील बनसोडे, डॉ. उल्हास माळकर, अनिल सुकते आदी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष डॉ. विश्राम लोमटे यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद होत आहे.

या परिषदेत देश-परदेशातील संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी होणार असून, विविध विषयांवर संशोधनपर लेख सादर केले जाणार आहेत, असे प्रसिद्धी विभागप्रमुख डॉ. मनोहर कोरे यांनी सांगितले.

25 MAR 2026

जनप्रवास

# डॉ. दु. का. संत ज्ञानाने भरलेले झाड : डॉ. अविनाश सांगोलेकर

- शिवाजी विद्यापीठात मराठी अधिविभागातर्फे व्याख्यानाचे आयोजन

जनप्रवास : कोल्हापूर

दु. का. संत हे संशोधन क्षेत्रातील ज्ञानतपस्वी होते, ते ज्ञानाने भरलेले झाड असून त्यांचे सर्व लेखन मौलिक चिंतनातून आलेले आहे, असे प्रतिपादन डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी मंगळवारी केले. शिवाजी विद्यापीठात मराठी अधिविभागातर्फे आयोजित डॉ. दु. का. संत व्याख्यानमालेअंतर्गत 'डॉ. दु. का. संतः जीवन आणि कार्य' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, दु. का. संत संशोधनातील पहिल्या पिढीचे अग्रदुत आहेत. संशोधन क्षेत्रातील त्यांचे कार्य हे मूलभूत स्वरूपाचे असून त्यांच्या सर्व लेखनामधून आस्था, जिव्हाळा आणि शिस्तीचा प्रत्यय येतो. या व्याख्यानासाठी विशेष उपस्थित असणारे दु. का. संत यांचे चिरंजीव उदयप्रकाश संत यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

## संत हे व्रतस्थ संशोधक

सांगोलेकर म्हणाले, दु. का. संत हे व्रतस्थ संशोधक आणि समीक्षक होते. त्यांनी काळाच्या पुढचा विचार करून केलेले लेखन आजही दिशादर्शक आहे. स्त्री मुक्ती संदर्भातील त्यांचे लेखन मौलिक स्वरूपाचे असून त्याला चिंतनाची जोड आहे.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, दु. का. संत यांचे लेखन आजच्या संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक आहे. तसेच, काळाच्या पुढचा विचार करून लिहिणारा लेखक दुर्लक्षित राहिला, याची खंत आहे. त्यांच्या संशोधनाचा, लेखनाचा आणि विचाराचा वारसा पुढे नेण्यासाठीच ही व्याख्यानमाला आहे. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. नीता संत, अमृता पाटील, शाल्मली संत, अभिजीत पाटील, डॉ. अनिल उबाळे, प्रा. पी. आर. गावडे यांच्यासह मराठी विभागातील संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

25 MAR 2026
पुण्यनगरी

# ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रम प्रवेश ३० मार्चपर्यंत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग व एआयसीटीई मान्यताप्राप्त ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रमाची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील जानेवारी-फेब्रुवारी २०२६ सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने दि. ३० मार्चपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रम गतवर्षापासून सुरू आहे. हा अभ्यासक्रम प्रवेश, अध्ययन, परीक्षा व निकालापर्यंत असणारी सर्व शैक्षणिक प्रक्रिया ही ऑनलाईन स्वरूपाची असणार आहे. ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रमाची पदवी ही इतर कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या समकक्ष आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकष एकचा दर्जा असणारे शिवाजी विद्यापीठ ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करून बदलत्या जगातील आव्हानांना विद्यार्थी समर्थपणे सामोरा जावा याकरिता एक ऐतिहासिक पाऊल टाकत आहे. घरबसल्या मोबाईल, संगणकाद्वारे जागतिक दर्जाचा ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सुवर्णसंधी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र इच्छुकांना देत आहे.

2 5 MAR 2026

पुढारी

# दु. का. संत संशोधन क्षेत्रातील ज्ञानतपस्वी : डॉ. सांगोलेकर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

दु. का. संत हे संशोधन क्षेत्रातील ज्ञानतपस्वी होते, असे प्रतिपादन डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात मराठी अधिविभागातर्फे आयोजित डॉ. दु. का. संत व्याख्यानमालेंतर्गत 'डॉ. दु. का. संत: जीवन आणि कार्य' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.



कोल्हापूर : व्याख्यानमालेत बोलताना डॉ. अविनाश सांगोलेकर.

सांगोलेकर म्हणाले, दु. का. संत हे ज्ञानाने भरलेले झाड असून त्यांचे सर्व लेखन मौलिक चिंतनातून आले आहे. संत हे व्रतस्थ संशोधक आणि समीक्षक होते.

यावेळी मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नीता संत, अमृता पाटील, शाल्मली संत, अभिजित पाटील, डॉ. अनिल उबाळे, प्रा. पी. आर. गावडे आदी उपस्थित होते. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले.

25 MAR 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्क्रीन टाईम कमी करुन आरोग्याकडे लक्ष द्या

## जिल्हाधिकारी अमोल येडगे यांचा सल्ला : शिवाजी विद्यापीठात आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर उत्साहात

**अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी उत्तम आरोग्याची गरज असून शरीराला योग्य विश्रांती दिली पाहिजे. त्यासाठी मोबाईलचा अतिवापर टाळून स्क्रीन टाईम कमी करा व आरोग्याकडे लक्ष द्या, असा सल्ला जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिला.**

प्रतिनिधी
कोल्हापूर





कोल्हापूर : आरोग्य शिबिराची पाहणी करताना जिल्हाधिकारी अमोल येडगे, प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सीपीआरचे वैद्यकीय अधिकारी डॉ. भूषण मिरजे, डॉ. आर. डी. सोनवणे, नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या शीतल सोनवणे. दुसऱ्या छायाचित्रात शिबीरात आरोग्य तपासणी करताना विद्यार्थी पथक.

### विद्यार्थी, कर्मचाऱ्यांनी घेतला लाभ; सीपीआर व नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम; ४५ जणांचे रक्तदान

१५४ जणांची सामान्य आरोग्य चाचणी तर ४६ जणांचे ईसीजी करण्यात आले. ४५ जणांनी रक्तदान केले.

व्हिडिओ पाहा

### मोफत आरोग्य सुविधा अशा

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 MAR 2026

जनप्रवास

# तरुणांनी मोबाईलचा वापर करिअरसाठी करावा

## जिल्हाधिकारी अमोल येडगे : विद्यापीठात आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन : हजाराहून अधिक जणांचा सहभाग

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने मंगळवारी 'आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन कोल्हा जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांना मानपत्र देण्यात आले व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सोहळ्याची सुरुवात झाली.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी भौतिकशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे आणि उत्कृष्ट संयोजनाचे कौतुक केले. आजच्या तरुणाईला मोलाचा सल्ला देताना ते म्हणाले की, तरुणांनी सोशल मीडियाचा अतिरेक वापर टाळून आपला 'स्क्रीन टाईम' कमी केला पाहिजे. मोबाईलचा उपयोग केवळ मनोरंजनासाठी न करता स्वतःच्या करिअरच्या प्रगतीसाठी आणि नवीन कौशल्ये आत्मसात करण्यासाठी करावा. तसेच, स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी तरुणांनी आरोग्याकडे लक्ष देऊन कायम तंदुरुस्त राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला अतिथी म्हणून लाभलेले मेनन बेअरिंग्ज लिमिटेड आणि मेनन अल्कॉप लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक अरुण अराध्ये यांनी विचार मांडले. ते म्हणाले की, कोल्हापूरचे उद्योगक्षेत्र अशा विधायक आणि सामाजिक उपक्रमांसाठी नेहमीच सकारात्मक असते. शिवाजी विद्यापीठात राबविल्या जाणाऱ्या अशा सर्व उपक्रमांना यापुढेही उद्योजकांकडून भरघोस पाठबळ दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विविध प्रायोजकांनी सढळ हाताने मदत करत मोठी देणगी दिल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्र. डॉ. सुरेश गोसावी यांनी भूषविले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी भौतिकशास्त्र विभागाच्या स्तुत्य उपक्रमाचे प्रशंसा केली. केवळ शैक्षणिक प्रगतीच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या अशा शिबिराचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल त्यांनी विभागाच्या सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे विशेष कौतुक केले.

नीम करोली बाबा चॅरिटेबल ट्रस्ट आणि सीपीआर रुग्णालय यांच्या सहकार्याने आयोजित या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, हजाराहून अधिक विद्यार्थी, प्राध्यापक आणि नागरिकांनी यामध्ये सहभाग नोंदवला.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विविध औद्योगिक व व्यावसायिक संस्थांनी सढळ हाताने आर्थिक आणि वस्तुरूप देणगी दिली. या उपक्रमाचे प्रमुख प्रायोजक खालीलप्रमाणे होते : मेनन बेअरिंग्ज लिमिटेड, एमआयडीसी गोकुळ शिरगाव, कोल्हापूर, हायलँड क्लब, शिरोली, सनशाईन एकवी, सायरी, सांगाव कास्टिंग्ज प्रायव्हेट लिमिटेड, कोल्हापूर, पार्थ ऑप्टिक्स, कोल्हापूर, आदित्य इंडस्ट्रीज, कोल्हापूर, सिद्धनाथ डेकोरेटर्स, कोल्हापूर, पद्मा फ्रिजरेशन, कागलवाडी. प्रास्ताविक भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्र. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संशोधन प्राध्यापक डॉ. एम. व्ही. टाकळे यांनी मानले. मा

न्यवरांच्या हस्ते फीत कापून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे, स्वप्नाल पाटोळेकर, भूषण मिरजे, वैद्यकीय अधीक्षक, कृष्णा लोंढे, विद्यार्थी, प्राध्यापक व विद्यापीठातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिराप्रसंगी जिल्हाधिकारी अमोल येडगे, अरुण अराध्ये, विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्र. (डॉ.) सुरेश गोसावी आदी.

### शिबिरामध्ये महत्त्वाच्या सुविधा पुरविल्या

कान, नाक आणि घसा, सामान्य शल्यचिकित्सा, अस्थिरोग, जनरल फिजिशियन आणि मेडिसिन, दंतचिकित्सा, त्वचा रोग, नेत्र तपासणी, बालरोग, हृदयरोग, स्त्रीरोग, उपस्थितांची डॉक्टरांनी तपासणी करून गरजूंना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. शिबिरात संपूर्ण रक्त व मूत्र तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध होती. आरोग्य तपासणीनंतर सर्व गरजू रुग्णांना आवश्यक ती औषधे मोफत पुरविली गेली. या उपक्रमांतर्गत अनेकांनी सामाजिक बांधिलकी जपत उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

25 MAR 2026

लोकसत्ता

# 'एआय'वर स्वार होणारेच टिकतील - अतुल कहाते




कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक कार्यक्रमात बोलताना डॉ. अतुल कहाते. सोबत डॉ. श्रीकृष्ण महाजन.

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**कोल्हापूर :** 'एआय' ची क्रांती त्सुनामी सारखी आली आहे, त्यावर स्वार होणारे टिकून राहतील, विरोध करणारे बाहेर फेकले जातील, अशा शब्दांत सुप्रसिद्ध माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ, लेखक अतुल कहाते यांनी गुरुवारी येथे कृत्रिम बुद्धिमत्ता आव्हानाच्या जबाबदारीची स्पष्टपणे जाणीव करून दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या वतीने आयोजित बिझनेस ॲप्लिकेशन ऑफ आर्टिफिशियल इंटलीजन्स या विषयावरील पाच दिवशीय मुल्यवर्धित अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन हे होते. याअंतर्गत पाच दिवसांत नामवंत तज्ज्ञांची तीस व्याख्याने होणार आहेत.

कहाते पुढे म्हणाले, साठ वर्षांतील प्रगती कृत्रिम बुद्धिमतेमुळे गेल्या दोन वर्षांत तंत्रज्ञानातील प्रगतीला प्रचंड गती मिळाली आहे. नोकऱ्या जाणार याची भीती सोडून 'एआय' बाबत जागरुकता वाढवून त्याची कौशल्ये प्राप्त केली पाहिजेत. विषयांचे मुलभूत ज्ञान व कौशल्ये असावेच लागेल. परंतु, कार्यकलापाचे सुलभीकरण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता क्रांतिकारक भूमिका बजावेल. 'एआय' सोबत काम करण्याची सवय करून घेतली पाहिजे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या ज्ञान आणि कौशल्यासह विद्यार्थी जगातील प्रश्नांना सामोरे जावेत यासाठी या अभ्यासक्रमाचे आयोजन प्रधानमंत्री ( पीएम-उषा सॉफ्ट कॉम्पोनंट ) अंतर्गत करण्यात आल्याचे प्रा. महाजन यांनी सांगितले. डॉ. केदार मारुलकर यांनी प्रास्ताविक, डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 MAR 2026 पुढारी

# निरोगी, सुदृढ तरुण हाच विकसित भारताचा शिल्पकार

## जिल्हाधिकारी येडगे; विद्यापीठात आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

तरुणांनी सोशल मीडियाचा अतिरिक्त वापर टाळून 'स्क्रीन टाईम' कमी केला पाहिजे. मोबाईलचा उपयोग केवळ मनोरंजनासाठी न करता करिअर व प्रगतीसाठी व नवीन कौशल्ये आत्मसात करण्यासाठी करावा. निरोगी व सुदृढ तरुण हाच विकसित भारताचा शिल्पकार आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी होते.

जिल्हाधिकारी येडगे यांनी स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी तरुणांनी आरोग्याकडे लक्ष देऊन कायम तंदुरुस्त राहण्याचे आवाहन केले. याप्रसंगी मेनन बेअरिंग्ज लिमिटेड आणि मेनन अल्कॉप लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक अरुण आराध्ये यांनी मनोगत व्यक्त केले.

नीम करोली बाबा चॅरिटेबल ट्रस्ट व सीपीआर यांच्या सहकार्याने आयोजित शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दोन हजारांहून अधिक विद्यार्थी, प्राध्यापक आणि नागरिकांनी यामध्ये सहभाग नोंदवला. २०० जणांची मोफत आरोग्य तपासणी तर ४५ जणांचे रक्तदान केले.

भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. संशोधन प्राध्यापक डॉ. एम. व्ही. टाकळे यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सिनेट सदस्य स्वागत परुळेकर, वैद्यकीय अधीक्षक भूषण मिरजे, समन्वयक कृष्णा लोंढे आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित शिबिरप्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी अमोल येडगे. सोबत डॉ. सुरेश गोसावी, डॉ. व्ही. एन. शिंदे, स्वागत परुळेकर, डॉ. राजेंद्र सोनकवडे.** (छाया : पप्पू अत्तार)

2 5 MAR 2026

सकाळ

# विद्यापीठात दोनशे जणांची मोफत तपासणी

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाचा भौतिकशास्त्र अधिविभाग, छत्रपती प्रमिलाराजे रूग्णालय आणि नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे आज मोफत आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर घेण्यात आले. त्यात १५४ जणांची तपासणी करण्यात आली, तर ४५ जणांनी रक्तदान केले.

जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन झाले. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. निरोगी आणि सुदृढ तरुण हाच विकसित भारताचा शिल्पकार असल्याचे येडगे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीबरोबरच आरोग्याकडेही लक्ष देणे गरजेचे असल्याचे गोसावी यांनी सांगितले.

कार्यक्रमात भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य स्वागत परुळेकर, मेनन बेअरिंग्ज लिमिटेड आणि मेनन अल्कॉप लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक अरुण आराध्ये, 'सीपीआर'चे वैद्यकीय अधीक्षक भूषण मिरजे, वैद्यकीय समन्वयक कृष्णा लोंढे प्रमुख उपस्थित होते. डॉ. मानसिंग टाकळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
2 5 MAR 2026
पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सार्वजनिक सुविधांसाठीच्या निधीत जीएसटीचा ७५ टक्के वाटा

## सहायक आयुक्त दीपाली पुजारी यांचे मत

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

'एक देश, एक कर' धोरणाची अंमलबजावणी झाल्यापासून देशात अनेक सुधारणा झाल्या आहेत. नागरिकांसाठी उपलब्ध सार्वजनिक सोयी-सुविधा पुरवण्यासाठी लागणाऱ्या निधीमध्ये ७५ टक्के वाटा वस्तू आणि सेवा कराचा (जीएसटी) आहे, असे मत कोल्हापूरच्या वस्तू व सेवा कर सहायक आयुक्त दीपाली पुजारी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचा वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभाग आणि इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (नवी दिल्ली) यांच्या सहयोगाने आयोजित 'जीएसटी सुधारणा, डिजिटलायझेशन अँड इझ ऑफ डुईंग बिझनेस : मार्चिंग टुवर्डस् विकसित भारत @२०४७' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये दुसऱ्या दिवशी त्या बोलत होत्या. दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात 'जीएसटी सुधारणांचा व्यवसाय आणि ग्राहकांवरील परिणाम' या विषयावरील परिसंवाद झाला. वस्तू आणि सेवा कराच्या नवीन रचनेमुळे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित जीएसटीविषयक राष्ट्रीय चर्चासत्रातील परिसंवादात बोलताना सहायक आयुक्त दीपाली पुजारी. सोबत दीपक पाटील, अजित कोठारी आदी. (छाया : पप्पू अत्तार)




खेळत्या भांडवली तुटवड्याला उद्योगांना सामोरे जावे लागेल, असे मत सी. ए. गिरीश सामंत यांनी मांडले. उद्योगपती अजित कोठारी यांनी ई-वे बिलमध्ये चुका दुरुस्त करण्यासाठी काही दिवसांची मुदत असावी, अशी आवश्यकता व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाचे अंतर्गत लेखापरीक्षक अजित चौगले, सी.ए. श्रीकांत बच्चे, दीपक पाटील, साईता बारस्कर यांनी मनोगत व्यक्त केले. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत केले. डॉ. केदार मारुलकर प्रास्ताविक केले. विद्यार्थिनी वैशाली वाघमारे यांनी आभार मानले.

महा न्यूज & व्ह्यूज
25 MAR 2026




शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सार्वजनिक सुविधांसाठीच्या निधीत जीएसटीचा ७५ टक्के वाटा : सहायक आयुक्त दीपाली पुजारी

कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :

'एक देश, एक कर' धोरणाची अंमलबजावणी झाल्यापासून देशात अनेक सुधारणा झाल्या आहेत. सामान्य नागरिकांसाठी उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सार्वजनिक सोयीसुविधा पुरवण्यासाठी लागणाऱ्या निधीमध्ये ७५% वाटा वस्तू आणि सेवा कराचा (जीएसटी) आहे, अशी माहिती कोल्हापूरच्या वस्तू व सेवा कर सहायक आयुक्त दीपाली पुजारी यांनी दिली.



शिवाजी विद्यापीठाचा वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभाग आणि इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (नवी दिल्ली) यांच्या सहयोगाने आयोजित 'जीएसटी सुधारणा, डिजीटलायझेशन अँड इझ ऑफ डुईंग बिझनेस: मार्चिंग टूवर्ड्स विकसित भारत२०४७' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये दुसऱ्या दिवशी त्या बोलत होत्या.

आज दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात ''जीएसटी सुधारणांचा व्यवसाय आणि ग्राहकांवरील परिणाम'' या विषयावरील परिसंवाद झाला. डॉ. केदार मारुलकर प्रास्ताविक केले. वस्तू आणि सेवा कराच्या नवीन रचनेमुळे खेळत्या भांडवली तुटवड्याला उद्योगांना सामोरे जावे लागेल, असे मत सी. ए. गिरिश सामंत यांनी मांडले. उद्योगपती अजित कोठारी यांनी इ-वे बिल मध्ये चुका दुरुस्त करण्यासाठी काही दिवसांची मुदत असावी, अशी आवश्यकता व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाचे अंतर्गत लेखापरीक्षक अजित चौगले यांनी शिक्षण संस्थांवर आकाराला जाणारा वस्तू आणि सेवा कर, विद्यार्थ्यांची करामुळे होणारी गैरसोय आणि सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या अडचणी या गोष्टींवर प्रकाश टाकला. सेक्शन ६५ वर चर्चा करत शिक्षक प्रतिनिधी सी.ए. श्रीकांत बच्चे यांनी करातील तरतुदींवर आवश्यक सुधारणांची माहिती दिली. सी.ए. दीपक पाटील यांनी वार्षिक करारात व्हॅल्यू आणि रेट यांमुळे होणारी गैरसोय दूर करण्याची आवश्यकता व्यक्त केली. विद्यार्थी प्रतिनिधी साईना बारस्कर यांनीही आपले मत मांडले.

वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी भारताचे जबाबदार नागरिक म्हणून आपण करचुकवेगिरीला आळा घातला पाहिजे आणि करप्रणालीबाबत जागरूक असले पाहिजे, असे मत व्यक्त केले. विद्यार्थिनी वैशाली वाघमारे यांनी आभार मानले.

महा न्यूज & व्ह्यूज




# दु. का. संत हे संशोधन क्षेत्रातील ज्ञानतपस्वी : डॉ. अविनाश सांगोलेकर

कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :

दु. का. संत हे संशोधन क्षेत्रातील ज्ञानतपस्वी होते, असे प्रतिपादन डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी आज केले. शिवाजी विद्यापीठात मराठी अधिविभागातर्फे आयोजित डॉ. दु.का. संत व्याख्यानमालेअंतर्गत 'डॉ. दु. का. संत: जीवन आणि कार्य' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

सांगोलेकर म्हणाले, दु. का. संत हे ज्ञानाने भरलेले झाड असून त्यांचे सर्व लेखन मौलिक चिंतनातून आलेले आहे. संत हे व्रतस्थ संशोधक आणि समीक्षक होते. त्यांनी काळाच्या पुढचा विचार करून केलेले लेखन आजही दिशादर्शक आहे. स्त्री मुक्ती संदर्भातील त्यांचे लेखन मौलिक स्वरूपाचे असून त्याला चिंतनाची जोड आहे.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, दु. का. संत संशोधनातील पहिल्या पिढीचे अग्रदूत आहेत. संशोधन क्षेत्रातील त्यांचे कार्य हे मूलभूत स्वरूपाचे असून त्यांच्या सर्व लेखनामधून आस्था, जिव्हाळा आणि शिस्तीचा प्रत्यय येतो. या



व्याख्यानासाठी विशेष उपस्थित असणारे दु. का. संत यांचे चिरंजीव उदयप्रकाश संत यांनी संत यांच्या आठवणींना उजाळा दिला.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, दु. का. संत यांचे लेखन आजच्या संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक आहे. तसेच, काळाच्या पुढचा विचार करून लिहिणारा लेखक दुर्लक्षित राहिला याची खंत आहे. त्यांच्या संशोधनाचा, लेखनाचा आणि विचाराचा वारसा पुढे नेण्यासाठीच ही व्याख्यानमाला आहे.

प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. नीता संत, अमृता पाटील, शाल्मली संत, अभिजीत पाटील, डॉ. अनिल उबाळे, प्रा. पी. आर. गावडे यांच्यासह मराठी विभागातील संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 MAR 2026
सकाळ

# सार्वजनिक सुविधांच्या निधीत जीएसटीचा ७५ टक्के वाटा

## दीपाली पुजारी : शिवाजी विद्यापीठात वाणिज्य विभागातर्फे राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता. २५ : 'एक देश, एक कर' धोरणाची अंमलबजावणी झाल्यापासून देशात अनेक सुधारणा झाल्या आहेत. सामान्य नागरिकांसाठी दिल्या जाणाऱ्या सार्वजनिक सोयीसुविधा पुरविण्यासाठी लागणाऱ्या निधीत ७५ टक्के वाटा वस्तू आणि सेवा कराचा (जीएसटी) आहे, अशी माहिती कोल्हापूरच्या वस्तू व सेवा कर सहाय्यक आयुक्त दीपाली पुजारी यांनी दिली.

विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभाग आणि इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (नवी दिल्ली) यांच्या सहयोगाने आयोजित 'जीएसटी सुधारणा, डिजिटलायझेशन अँड इज ऑफ डुइंग बिझनेस : मार्चिंग टुवर्ड्स विकसित भारत @२०४७' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात दुसऱ्या दिवशी त्या बोलत होत्या. पहिल्या सत्रात 'जीएसटी सुधारणांचा व्यवसाय आणि ग्राहकांवरील परिणाम' या विषयावरील परिसंवाद झाला. डॉ. केदार मारूलकर प्रास्ताविक केले.

वस्तू आणि सेवा कराच्या नवीन रचनेमुळे छोट्या व्यावसायिकांना तुटवड्याला उद्योगांना सामोरे जावे लागेल, असे मत सीए गिरीश सामंत यांनी मांडले. उद्योगपती अजित कोठारी यांनी ३-बी बिलामध्ये चुका दुरुस्त करण्यासाठी मुदत असावी. लेखापरीक्षक अजित चौगले यांनी शिक्षण संस्थांवर आकारला जाणारा वस्तू आणि सेवा कर, विद्यार्थ्यांवर त्यामुळे होणारी गैरसोय आणि ग्राहकांना जाव्या लागणाऱ्या अडचणी या गोष्टींवर प्रकाश टाकला. सीए श्रीकांत [illegible] यांनी कायद्यातील तरतुदीत आवश्यक सुधारणांची माहिती दिली. सीए दीपक पाटील यांनी वार्षिक करात बदल आणि रेट यामुळे होणारी गैरसोय दूर करण्याची आशा व्यक्त केली. साईता बारामकर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी करानुकूलतेविषयी आढावा घ्यायला पाहिजे, असे मत व्यक्त केले. वैशाली [illegible] यांनी आभार मानले.

२ ५ MAR 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सार्व. सुविधांच्या निधीत जीएसटीचा ७५ टक्के वाटा

## साहाय्यक आयुक्त दीपाली पुजारी : शिवाजी विद्यापीठात जीएसटीविषयक राष्ट्रीय परिसंवाद



कोल्हापूर : परिसंवादात बोलताना कोल्हापूर जीएसटी कार्यालयाच्या साहाय्यक आयुक्त दीपाली पुजारी, बाजूस दीपक पाटील, अजित कोठारी, गिरीश सामंत, डॉ. श्रीकृष्ण महाजन, श्रीकांत बच्चे, अजित चौगुले आणि साईता बारस्कर.

प्रतिनिधी
कोल्हापूर

'एक देश, एक कर' धोरणाची अंमलबजावणी झाल्यापासून देशात अनेक सुधारणा झाल्या आहेत. सामान्य नागरिकांसाठी उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सार्वजनिक सोयीसुविधा पुरवण्यासाठी लागणाऱ्या निधीमध्ये ७५ टक्के वाटा वस्तू आणि सेवा कराचा (जीएसटी) आहे, अशी माहिती कोल्हापूरच्या वस्तू व सेवा कर साहाय्यक आयुक्त दीपाली पुजारी यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभाग आणि इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (नवी दिल्ली) यांच्या सहयोगाने आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात त्या बोलत होत्या. 'जीएसटी सुधारणा, डिजिटलायझेशन अँड इझ ऑफ डुईंग बिझनेस : माध्यम टुवर्ड्स विकसित भारत २०४७' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

परिसंवादाच्या दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात 'जीएसटी सुधारणांचा व्यवसाय आणि ग्राहकांवरील परिणाम' या विषयावर परिसंवाद झाला. डॉ. केदार मारुलकर यांनी प्रास्ताविक केले. वस्तू आणि सेवा कराच्या नवीन रचनेमुळे खेळत्या भांडवली तुटवड्याला उद्योगांना सामोरे जावे लागेल, असे मत सी. ए. गिरीश सामंत यांनी व्यक्त केले. उद्योगपती अजित कोठारी यांनी ई – वे बिलमध्ये चुका दुरुस्त करण्यासाठी काही दिवसांची मुदत असावी, अशी आवश्यकता व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाचे अंतर्गत लेखापरीक्षक अजित चौगले यांनी शिक्षण संस्थांवर आकारला जाणारा वस्तू आणि सेवा कर, विद्यार्थ्यांची करामुळे होणारी गैरसोय आणि सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या अडचणी या गोष्टींवर प्रकाश टाकला. सेक्शन ६५ वर चर्चा करत शिक्षक प्रतिनिधी सीए श्रीकांत बच्चे यांनी करातील तरतुदींवर आवश्यक सुधारणांची माहिती दिली. सी.ए. दीपक पाटील यांनी वार्षिक करारात क्लॉज आणि रेट प्रामुळे होणारी गैरसोय दूर करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

वैशाली बावस्कर यांनी आभार मानले.

### कर चुकवेगिरीला आळा आवश्यक : डॉ. महाजन

विद्यार्थी प्रतिनिधी साईता बारस्कर यांनीही विचार व्यक्त केले. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी भारताचे जबाबदार नागरिक म्हणून आपण कर चुकवेगिरीला आळा घातला पाहिजे व करप्रणालीबाबत जागरूक असले पाहिजे, असे मत व्यक्त केले.